# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक, उच्चशिक्षण, औरंगाबाद विभाग,
देवगिरी महाविद्यालयाजवळ, रेल्वेस्टेशन रोड, (नविन इमारत) औरंगाबाद

email : jdheaur_2007@rediffmail.com

फोन नं.२३३१९१३ एस.टी.डी. ०२४० फॅक्स २३३१९१३


जा.क्र.शिससं/उशि/औवि/२०१५-१६/ ६८ - ६९ दिनांक:- ०६/०१/२०१६

प्रति,

१) **कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.**

२) **प्राचार्य, अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारिरिक शिक्षण महाविद्यालये, औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबाद.**

**विषय :- सन २०१५-१६ च्या खरीप हंगामात ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.**

**संदर्भ :- १. महसूल व वन विभाग क्र.एससीवाय२०१५/प्र.क्र.३११/म-७, दि.२०-१०-२०१५**

**२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. शुल्क-५२१५/प्र.क्र.३७४/१५/मशि-२, दि.२४-११-२०१५**

**३. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग, क्र. एफईडी १५९२/१२०२/(११३२)/साशि -५ दिनांक १८ ऑक्टोबर १९९३**

**४. उशिसं/१४अई/२०१५-१६/टंचाईग्रस्त/१२२५०/शिष्यवृत्ती दिनांक २६-११-२०१५**

**५. या कार्यालयाचे पत्र क्रमांक शिससं/उशि/औवि/२०१५-१६/६८६२-६३ दिनांक ०१-१२-२०१५**

**६. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/अवर्षण/२०१५-१६/१२४८५ दि.०३-१२-२०१५**

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ६ अन्वये कळविण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २०-१०-२०१५ व २४-११-२०१५ अन्वये शासनाने एकूण ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी घोषित केलेल्या एकूण १४७०८ गावांमध्ये टंचाईग्रस्त दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलेली आहे. या टंचाईग्रस्त दुष्काळसदृश्य गावांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंदर्भात तात्काळ कार्यवाही करावयाची आहे.

तरी, आपण आपल्या महाविद्यालयात शिक्षण घेणा-या टंचाईग्रस्त दुष्काळसदृश गावांतील टंचाईग्रस्त विद्यार्थ्यांची संख्या व सदर विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काची प्रतीपुर्ती करण्यापोटी लागणारी एकूण रक्कम सोबत जोडलेल्या पत्रातील विहीत नमुण्यात तात्काळ या कार्यालयास jdheaur_2007@rediffmail.com या ई-मेल वर सॉफ्ट कॉपी MS-Excel मध्ये तयार करून हार्ड कॉपीसह सादर करण्याबाबत आपणास या कार्यालयाचे पत्र क्रं.६९१९-२० दि.०३/१२/२०१५ नुसार कळविण्यात आले होते परंतू अद्याप पर्यंत माहिती अप्राप्त आहे. तरी तात्काळ माहिती देण्यात यावी. नसता विलंबास व होणा-या परिणामास आपण जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

RSDhemnasker 06.01.16

सहसंचालक
(उच्च शिक्षण)
औरंगाबाद विभाग औरंगाबाद.

सोबत :- संदर्भीय शासन निर्णय व पत्राची प्रत